0 9 JUN 2023
जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छ. शिवरायांनी नवसमाजनिर्मितीचा पाया घातला

## डॉ. नंदकुमार मोरे; विद्यापीठात शिवस्वराज्य दिनानिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे बीज पेरले; मात्र हे काम सांघिक आहे, असा विचार त्यांनी पेरला. हेच त्यांच्या स्वराज्यनिर्मितीचे गमक होय. स्वराज्यनिर्मितीतून त्यांनी नवसमाजनिर्मितीचा पाया घातला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित 'शिवरायांची स्वराज्याची संकल्पना' या विषयावरील व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मोरे म्हणाले, भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाच्या वाटचालीत कधी झाली नव्हती अशी घटना ३५० वर्षांपूर्वी घडली, ती म्हणजे शिवराज्याभिषेक होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी नूतन सृष्टी आणि नवीन स्वराज्य स्थापन केले. यातून नवसमाजरचनेचा पाया रचला गेला. शिवाजी महाराजांच्या कार्याचे निरीक्षण केले, तर त्यांच्याकडे कल्पकता, धाडसी वृत्ती, वैचारिक प्रगल्भता, दूरदृष्टी आणि सौजन्य दिसून येते.

प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांनी 'शिवराज्यभिषेक : स्वरूप आणि महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य संकल्पना राबविण्याचे व समाजबांधणीचे कार्य उत्कृष्टपणे केले. ३० वर्षांमध्ये महाराजांनी स्वराज्याची यंत्रणा, नीतीमत्तेचा आधार उभा केला. त्यासाठी अखंड मेहनत घेतली. अडचणींचे निराकरण करण्यासाठी आणि प्रशासन अधिक सोयीस्कर होण्यासाठी शिवाजी महाराज यांनी राज्याभिषेक केला. राज्याभिषेकाच्या स्मृती जपण्यासाठी महाराजांनी स्वतःच्या नावाचा कधीही उपयोग केला नाही. उलट शूर सैन्याचा व सरदारांचा वेळोवेळी सन्मान आणि सत्कार केला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. नंदकुमार मोरे. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. इस्माईल पठाण, डॉ. विलास शिंदे. (छाया : अर्जुन टाकळकर)

जनसंपर्क कक्ष

09 JUN 2023 सकाळ

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवरायांनी नवसमाजनिर्मितीचा पाया घातला : डॉ. मोरे

**कोल्हापूर, ता. ८ :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे बीज पेरले. मात्र, हे काम सांघिक आहे, असा विचार त्यांनी पेरला. हेच त्यांच्या स्वराज्यनिर्मितीचे गमक होय. स्वराज्यनिर्मितीतून त्यांनी नवसमाजनिर्मितीचा पाया घातला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.



डॉ. नंदकुमार मोरे

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित 'शिवरायांची स्वराज्याची संकल्पना' विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाच्या वाटचालीत कधी झाली नव्हती, अशी घटना ३५० वर्षांपूर्वी घडली, ती म्हणजे शिवराज्याभिषेक होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी नूतन सृष्टी आणि नवीन स्वराज्य स्थापन केले. यातून नवसमाज रचनेचा पाया रचला गेला, असे डॉ. मोरे यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांनी 'शिवराज्यभिषेक : स्वरूप आणि महत्त्व' या विषयावर विवेचन केले. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य संकल्पना राबविण्याचे आणि समाजबांधणीचे कार्य अत्यंत उत्कृष्टपणे केले.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी शिवचरित्र वाचलेच पाहिजे, असा चंग बांधला पाहिजे.' या कार्यक्रमात इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2023
क्रांतीसिंह

# देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांत शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर(प्रतिनिधी):-केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सोमवारी जाहीर केलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२३) मध्ये येथील शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान कायम राखले आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी त्याबाबतची माहिती दिली. सन २०१६ पासून एनआयआरएफ क्रमवारी जाहीर करण्यात येत आहे. पहिल्या वर्षी अर्थात सन २०१६ मध्ये या क्रमवारीत देशभरातील अवघ्या ३५६५ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. गेल्या वर्षी म्हणजे सन २०२२ मध्ये ५५४३ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. त्यावेळी शिवाजी विद्यापीठ १०१-१५० या बँडमध्ये होते. यंदा सन २०२३ मध्ये देशभरातील एकूण ८६८६ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्यानंतर सुद्धा शिवाजी विद्यापीठाने १५१-२०० बँडमध्ये देशातील आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान पटकावले असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याबरोबरच संशोधन संस्था, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर व नियोजन, वैद्यकीय, दंतवैद्यकीय, कायदा, कृषी व कृषीपूरक क्षेत्रे आणि नाविन्यता या क्षेत्रांतील शैक्षणिक संस्थांचाही या क्रमवारीमध्ये समावेश आहे.

0 9 JUN 2023
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

## इंटरनेट बंद असल्याने प्रश्नपत्रिका पाठवल्या ऑफलाईन : सांगली व सातारा जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन पाठवल्या प्रश्नपत्रिका

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. या परीक्षांना सिक्युअर रिमोट पेपर डिलिव्हरी (एसआरपीडी)तून प्रश्नपत्रिका पाठवली जाते. परंतू गुरुवारी इंटरनेट बंद असल्याने प्रश्नपत्रिका ऑनलाईन पाठवता येणार नाही. म्हणून विद्यापीठातील परीक्षा विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परीक्षा केंद्रावरील समन्वयकांना प्रत्यक्ष बोलावून छपाई केलेल्या प्रश्नपत्रिका दिल्या. त्यामुळे सर्व परीक्षा वेळेत व सुरळीत पार पडल्या. तर सर्वसाधारण १८ गैरप्रकार उघडकीस आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विधी, बी. ए. बीएड, इंटीरिअर डिझाईन या विषयांच्या परीक्षा शहरातील आठ केंद्रांवर झाल्या. इंटरनेट बंद असले तरी या केंद्रांवर प्रश्नपत्रिका वेळेत पोहचाव्या म्हणून बुधवारी रात्री उशिरापर्यंत परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी काम करीत होते. परीक्षेतील प्लान बी प्रमाणे प्रश्नपत्रिका छपाई करून घेतल्या. छपाई केलेल्या प्रश्नपत्रिका घेवून जाण्यासाठी महाविद्यालयातील परीक्षा समन्वयकांना सूचना दिल्या. त्यानुसार त्यांनी विद्यापीठात येवून प्रश्नपत्रिका घेवून गेल्याने परीक्षा वेळेत व सुरळीत पार पडली. तसेच सांगली व सातारा या दोन जिल्ह्यांमधील परीक्षा केंद्रांना एसआरपीडीच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका पाठवल्या. दोन्ही जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन प्रश्नपत्रिका पोहोचवण्यात कोणतीही अडचण आली नसल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.



### तंत्रनिकेतनच्या प्रवेशासाठी इंटरनेटचा अडथळा

शासकीय तंत्रनिकेतनसह खासगी तंत्रनिकेतनची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. गेल्या दोन दिवसापासून या प्रवेशासाठीची सर्व्हर डाऊन असल्याने विद्यार्थ्यांना नावनोंदणी करण्यास अडचणी आल्या. तर गुरुवारी कोल्हापूर जिल्ह्यात इंटरनेट सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना नावनोंदणीच करता आली नाही. त्यामुळे तंत्रज्ञान संचनालयाकडून नावनोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात येणार का? याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे. तंत्रज्ञान संचनालयाने ww.gpkolhapur.org.in, www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरण्याचे आवाहन केले आहे. परंतू विद्यार्थ्यांना संकेतस्थळावर अर्जच ओपन होत नसल्याने अर्ज भरण्यास अडचणी येत आहेत. शासकीय तंत्रनिकेतनमध्ये सिव्हील इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग, इन्फरमेशन टेक्नॉलॉजी, मेटालार्जीकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ट टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. परंतू अद्याप फक्त ३० अर्ज आल्याचे महादेव कागवाडे यांनी सांगितले.

### एसआरपीडी समन्वयकांकडे सीलबंद प्रश्नपत्रिका दिल्या

परीक्षा केंद्रावरील एसआरपीडी समन्वयकांचे आयडेंटी कार्ड पाहूनच विद्यापीठातील परीक्षा विभागाने सीलबंद प्रश्नपत्रिका दिल्या. महाविद्यालयावर परीक्षेच्यावेळीच प्रश्नपत्रिकेचे सीलबंद पाकीट प्राचार्यांच्या परवानगीने फोडण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे सुरळीतपणे प्रश्नपत्रिका पोहचल्या, तर परीक्षाही सुरळीत पार पडल्या.

### अकरावी प्रवेश नावनोंदणी १४ जूननंतरही करता येणार

अकरावी प्रवेश प्रक्रिया गेल्या आठवड्यापासून सुरू आहे. आतापर्यंत जवळपास दीड हजार विद्यार्थ्यांनी भाग एक ऑनलाईन अर्ज भरून नावनोंदणी केली आहे. परंतू गुरुवारी दिवसभर इंटरनेट बंद असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता आला नाही. परंतू विद्यार्थ्यांना १४ जूननंतरही अर्ज भाग एक व भाग दोन भरता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता इंटरनेट सुरू झाल्यानंतर अर्ज भरवा, असे आवाहन साहाय्यक शिक्षण संचालक सुभाष चौगुले यांनी केले आहे. अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच गुरुवारी इंटरनेट बंद असल्याने विद्यार्थी व पालक अस्वस्थ झाले. आपण वेळेत अर्ज भरला नाही तर प्रवेश मिळणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतू शिक्षण उपसंचालक कार्यालयाने १४ जूनपासून अकरावी प्रवेशासाठी नावनोंदणीसह परीक्षा अर्ज भरता येणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे, त्यामुळे काही पालकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

लोकमत

# विद्यापीठात रमले बालकल्याण संकुलचे विद्यार्थी

कोल्हापूर : बालकल्याण संकुलच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठास भेट देत तेथील विविध विभागांची माहिती करून घेतली. पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणशास्त्र आदी विभाग व कोल्हापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने २ जूनला बालकल्याण संकुल येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. यातील यशस्वी विद्यार्थ्यांना पर्यावरणशास्त्र विभागात पारितोषिक वितरण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील प्राणीसंग्रहालय, रेशीमशास्त्र तंत्रज्ञान, पर्यावरणशास्त्र विभागाला भेट दिली. यावेळी अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. टी. ठकार व माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत केले.

लोकमत

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत उद्या मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबत उद्या, शनिवारी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली आहे.

शाहू स्मारक भवनात सकाळी १० ते दुपारी १ या कालावधीत ही कार्यशाळा होणार असून, रजिस्ट्रेशन, पसंतीक्रमांक, मेरिट लिस्ट, प्रवेश प्रक्रिया यासह विविध विषयांवर तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे चेअरमन आर. एन. पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

लोकमत

# १६०० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून गुरुवारी एलएलबी व बीएबीएडच्या परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षेसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध केंद्रांवर १६०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विशेष म्हणजे दंगलीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्यातील इंटरनेट सेवा बंद असतानाही विद्यापीठाच्या परीक्षा जिल्ह्यात सुरळीत पार पडल्या. इंटरनेटअभावी सीआरपीडी यंत्रणा कोलमडून पडल्याने विद्यापीठ परीक्षा विभागाने सीआरपीडी समन्वयकांना प्रत्यक्ष हातात प्रश्नपत्रिका दिल्या. त्यांच्याद्वारे त्या परीक्षा केंद्रांवर पोहोचवून वेळेत परीक्षा घेण्यात आल्या. कोल्हापूर शहरात न्यू लॉ कॉलेज, शहाजी लॉ कॉलेज व महावीर कॉलेजमध्ये या परीक्षा पार पडल्या.

पुढारी

# बी. कॉम. अॅडव्हान्स अकौंटन्सी विषयाची उद्या फेरपरीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बी.कॉम.(सीबीसीएस) भाग-३ अॅडव्हान्स अकौंटन्सी पेपर-४ (टॅक्सेशन) विषयाची फेरपरीक्षा शनिवार, दि. १० जून रोजी दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत घेण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठाने ३१ मे रोजी बी.कॉम.(सीबीसीएस) भाग-३ सत्र-६ या अभ्यासक्रमांच्या परीक्षेतील अॅडव्हान्स अकौंटन्सी पेपर-४ (टॅक्सेशन) विषयाचा दुपारच्या सत्रातील पेपर फुटल्याने रद्द केला. त्या विषयाचा नवीन पेपर सर्व संबंधित महाविद्यालयांना पाठविला होता. तथापि, ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना नवीन पेपर न देता प्रथमतः पाठविलेला पेपर दिला, अशा सर्व महाविद्यालयांमधील संबंधित विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेतली जाणार आहे.

पुण्यनगरी

# ॲडव्हान्स अकौंटन्सीची उद्या फेरपरीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ३१ मे रोजी आयोजित केलेल्या बी.कॉम. भाग-३ सत्र-६ या अभ्यासक्रमाच्या परीक्षेतील ॲडव्हान्स अकौंटन्सी टॅक्सेशन या विषयाचा पेपर काही अपरिहार्य कारणामुळे रद्दबातल केला होता. त्या विषयाचा नवीन पेपर सर्व संबंधित महाविद्यालयांना वितरित केलेला होता. तथापि, ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना नवीन पेपर वितरित न करता प्रथम पुरविलेला पेपर वितरित केला आहे, त्या सर्व महाविद्यालयांमधील संबंधित विद्यार्थ्यांची ॲडव्हान्स अकौंटन्सी टॅक्सेशन या विषयाची फेरपरीक्षा शनिवार, दि. १० जून रोजी दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत आयोजित केल्याचे विद्यापीठ प्रशासनाने कळवले आहे.

सकाळ

# विद्यापीठ परीक्षा मंडळाने 'प्रिंट' काढून पाठवले पेपर

## इंटरनेट बंदच्या पार्श्वभूमीवर दक्षता

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. ८ : इंटरनेट बंदच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी सत्रातील परीक्षा खंडित होऊ नयेत याची दक्षता शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतली. या मंडळाने इंटरनेट नसलेल्या कोल्हापूर शहरातील तीन केंद्रांवर प्रिंट काढून आज पेपर पाठवले. त्यात लॉ (तीन वर्ष, पाच वर्ष) आणि बीए. बीएड अभ्यासक्रमांच्या पेपरचा समावेश होता.

आक्षेपार्ह स्टेटसच्या पार्श्वभूमीवर गृहविभागाने जिल्ह्यातील इंटरनेट सेवा बुधवारी सायंकाळी बंद केली. त्यामुळे परीक्षेत कोणताही व्यत्यय येऊ नये म्हणून विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने जिल्ह्यातील केंद्रांवर प्रिंट काढून पेपर पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पेपर प्रिंट करण्याची प्रक्रिया रात्री पूर्ण करून सकाळी आठ वाजता शहरामधील तीन केंद्रांवरील एसआरपीडी समन्वयकांकडे पेपरची सीलबंद पाकिटे पोहोचवली. त्यात शहाजी लॉ कॉलेज, भारती विद्यापीठाचे न्यू लॉ कॉलेज आणि महावीर कॉलेज या केंद्रांचा समावेश आहे. त्याठिकाणी वेळेत सुरळीतपणे परीक्षा पार पडली. सांगली आणि सातारा जिल्ह्यातील केंद्रांवर नियमितपणे 'एसआरपीडी' प्रणालीद्वारे पेपर पाठविल्याची माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

## अकरावीसह अन्य प्रवेश प्रक्रिया ठप्प

■ गेल्या सहा दिवसांपासून शहरातील २८ महाविद्यालयांतील इयत्ता अकरावीची वाणिज्य इंग्रजी माध्यम आणि विज्ञान विद्याशाखेची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरू आहे. ही प्रक्रिया आज ठप्प झाली. या प्रक्रियेअंतर्गत बुधवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत एकूण २१५० विद्यार्थ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया बंद राहिली.

तरूण भारत

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शनिवारी

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

- शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाची माहिती

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेसंदर्भात शनिवार १० जून रोजी सकाळी १० वाजता मार्गदर्शन केले जाणार आहे. हे मार्गदर्शन शिबिर दसरा चौकातील शाहू स्मारक भवन येथे सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत सुरू राहील. तरी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. एस. एन. सपली यांनी केले आहे.

बारावीचा निकाल जाहीर झाला असून सीईटीचा निकाल लवकरच जाहीर होईल. त्यामुळे पदवी अभियांत्रिकीला प्रवेश घेण्याबाबत विद्यार्थी व पालकांच्या मनात अनेक शंका आहेत. या शंकांचे निरसन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन शिबिर ठेवण्यात आले आहे.

या शिबिरात नावनोंदणी, पसंतीक्रम, मेरीट लिस्ट, प्रवेश प्रक्रियेचे विविध टप्पे, प्रत्यक्ष प्रवेश व अत्यावश्यक कागदपत्रांविषयी माहिती दिली जाणार आहे. तसेच शासनाच्या विविध शिष्यवृत्ती, अभियांत्रिकीच्या विविध शाखांची व प्रमुखांची माहिती दिली जाणार आहे. तरी विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. पी. डी. पाटील, प्रा. महेश साळुंखे, इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सचे सचिव एस. बी. खोत यांनी केले आहे.